# FINAL EXAM 2022-23
# SUBJECT :- MARATHI

**CLASS :- 7 th ........** **MARKS : 80**

---

विभाग 'अ'

**प्रश्न १ ला (अ) : — शब्दार्थ लिहा.** ६

१) विनियोग करणे — २) माफ — ३) ताबा ४) संशय
५) उशिर ६) अंबर —

**प्रश्न १ ला (ब) :— रिकाम्या जागा.** ६

१) त्याच्या डोक्यावर ..................... मुकूट खोचला.
२) त्याला नेहमी पराक्रमी योद्ध्यांचे .............. वाचायला आवडे.
३) तो बघा त्या ............................ पाठीमागे.
४) तोंडात बोट घालून त्याने ....................... घातली.
५) ही बघ ................... छडी.
६) एकदा .......................... कॅम्प सुरू होता.

**प्रश्न १ ला (क):— चूक किंवा बरोबर ते लिहा.** ३

१) गड ताब्यात घेताच राजे प्रतापगडावर गेले.
२) संगतीपेक्षा उच्च शिक्षण महत्वाचे असते.
३) प्रभू येशू मरियाचा पुत्र आहे.
४) श्रीरंगाच्या शाळेतील सर्व मित्र टवाळखोर होते.
५) गुड फ्रायडेला येशूचा जन्मदिवस आहे.
६) श्याम पोहणे शिकला.

**प्रश्न २ रा (अ) :— कोण ते लिहा.** ४

१) फ्युज दुरूस्त करणारा. ................................
२) देतो तो ....................................
३) कवेत अंबर घेतांना (पाय) ..........................
४) आई जवळ न झोपलेली ............................

**प्रश्न २ रा (ब) :— जोडया लावा.** २

| अ | ब |
|---|---|
| १) भाऱ्यातून निघालेली | अ) ओठांवरती |
| २) आव्हानाचे लावावे | ब) विहिर |
| ३) हसू असावे | क) अत्तर |
| ४) देवधरांची | ड) तलवार |

https://www.cbseboardonline.com

**प्रश्न ३ रा :— घटनांचा योग्य क्रम लावा. ४**

3 १) देवासमोर शपथ घेतली.
4 २) भात खाली टाकला गेला.
8 ३) राजांनी पहिला गड जिंकला.
5 ४) पहारेकरी व सैनिक यात संवाद झाला.
6 ५) भारे घेऊन सारे निघाले.
2 ६) सर्वांनी झऱ्यावर हातपाय धुतले.
1 ७) सारे रोहिडेश्वरला निघाले.
7 ८) लढाई झाली.

**विभाग 'ब'**

**प्रश्न १ ला :— एका वाक्यात उत्तरे लिहा. १२**

१) विकास आमटे यांना लहानपणापासून कशाची आवड होती ?
२) छकुलीची मैत्रीण कोण ?
३) शब्दांमध्ये काय झळकावी ?
४) जगायचं असेल तर कशाच जीवन जगायचं ?
५) पुण्या —मुंबईला काय आहे ? Water Pipe
६) आयुष्याला उत्तर कसे दयावे ?
७) आयुष्यात मोठे होण्यासाठी कशाची गरज आहे ?
८) कुणाची गुलामी नको ?
९) आनंदवनात असतांना लेखक व त्यांचे भाऊ कोणते कपडे वापरायचे ?
१०) पहाड कोणत्या नावाने ओळखला जातो ?
११) श्रीरंगाला लहानपणी कशाची आवड होती ?
१२) प्रभू येशूने अंतसमयी किती वचने सांगितली ?

**प्रश्न २ रा :— कोण कोणास म्हणले. ४**

१) "सकाळी मारमार मारिलेस आणि आता दही देतेस"
२) "दादाजी, पुन्हा विचार करा."
३) "तिकडे आमच्याकडे नाही बोवा आला."
४) "गडावर तोफ आहे?"

**प्रश्न ३ रा :— खालील काव्यपंक्तीचे संदर्भासह स्पष्टीकरण करा. २**

१) पाय असावे जमिनीवरती, कवेत अंबर घेतांना
हसू असावे आंठांवरती काळीज काढून देतांना

**किंवा**

२) कोणाच्याही मनावर । पाडू नये चरे ।
कोणाचेही वर्म । व्यंग आणि बिंग ।
जातपात धर्म । काढूच नये ।।

https://www.cbseboardonline.com

प्रश्न ४ था :— थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही सहा) १२

१) जेरूसलेम कुठे आहे ते लिहा ?
२) विद्यार्थ्यांना उज्वल भविष्याच्या पूर्तीसाठी काय करायला पाहिजे ?
३) आईने पोहणे आवश्यक आहे हे श्यामला कसे पटवून दिले ?
४) राजांचे सैन्य राहिडेश्वर गडावर केव्हा व कसे पोहोचले ?
५) मंजुळाबाई गरीब आहे कशावरून स्पष्ट होते ?
६) आपण डॉक्टर व्हावं, असं लेखकाला का वाटू लागले ?
७) प्रभू येशूला क्रुसावर का चढवले गेले ?
८) श्रीरंगला नेहमी काय वाचायला आवडे ?

विभाग 'क'

प्रश्न १ ला (अ) :— वचन बदला. २

१) काटे २) शेंडी ३) बांगडी ४) पुस्तक

प्रश्न १ ला (ब) :— लिंग बदला. २

१) शिक्षक २) देव ३) शहाणा ४) किल्लेदारीण

प्रश्न १ ला (क) :— विरूध्दार्थी शब्द लिहा. २

१) पवित्र २) जगणं ३) वाईट ४) मित्र

प्रश्न २ रा :— खालील वाक्यातील काळ ओळखा. २

१) ताई रांगोळी छान काढते.
२) आईने पुरणपोळी केली.
३) परीक्षा पुढील महिन्यात होतील.
४) मुग्धा सकाळी लवकर उठेल.

प्रश्न ३ रा :— शब्द समुहाला एक शब्द लिहा. २

१) 'घोडे बांधायची जागा.
२) कैदी ठेवण्याची जागा.
३) गाणे गाणारा.
४) भाषण करणारा.

प्रश्न ४ था :— अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा. ४

१) रात्रीचा दिवस करणे २) डोक्यावर घेणे

https://www.cbseboardonline.com

**प्रश्न ५ वा :— पत्रलेखन. (कोणतही एक) ३**

१) आजारी असल्यामुळे शाळेत हजर राहू शकत नाही, याकरिता आठ दिवसाची सुट्टी मागणारे पत्र शिक्षकांना लिहा.

**किंवा**

**:— जाहिरात लेखन.**

१) शाळेत प्रवेश देणे सुरू आहे. त्यासाठी जाहिरात तयार करा

**प्रश्न ६ वा :— निबंधलेखन (कोणतेही एक) ३**

१) नदीचे आत्मवृत्त

२) राजमाता जिजाऊ

३) भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार — डॉ. बाबासाहेब आंबेडकर

४) पहिली स्त्री शिक्षिका — सावित्रीबाई फुले

**प्रश्न ७ वा :— खालील उतार वाचून दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. ५**

याच कालखंडात घडलेली एक गोष्ट मात्र जोतीरावांच्या मनोधैर्याची व लोकाभिमुखतेची ग्वाही देणारी आहे. हिंदुस्थानचे त्यावेळचे व्हाईसरॉय लार्ड लिटन यांच्या पुणे भेटीच्या निमित्याने शहर सुशोभित करण्यासाठी एक हजार रूपये खर्च करण्याचा नगरपालिकेच्या अध्यक्षांचा इरादा होता. वेळ थोडा असल्याने सभा न घेता तसे परिपत्रक काढून त्यांनी सभासदांच्या समितीसाठी पाठविले होते. शासकिय सभासदांच्या समितीचा प्रश्नच नव्हता. बिगर शासकिय सभासदांपैकी काहिंनी अनुकुल व प्रतिकुल यांपैकी कोणत्याच रकाण्यात सही केली नाही. बाकी सर्वांनी संमती दिली. त्यात जोतीरावांचे मित्र हरिरावजी देखिल होते. त्यामुळे याबाबतीत जोतीराव एकाकी पडले. परंतू कोणाच्याही रागा लोभाची पर्वा न करता त्यांनी एकट्याने आपला विरोध नोंदवला. आपल्या सारख्या गरीब देशात नुसत्या शहर सजावटीसाठी इतका खर्च करणे योग्य नाही. त्याऐवजी ही रक्कम मागासलेल्या वर्गाच्या शिक्षणासाठी उपयोगात आणावी असे जोतीरावांचे मत होते.

**प्रश्न :—**

१) लॉर्ड लिटन यांच्या पुणे भेटीच्या निमिताने नगरध्यक्षांनी कोणता बेत आखला होता ?

२) लॉर्ड लिटन यांचे स्वागत समारंभाच्या खर्चाच्या मंजूरीसाठी नगरध्यक्षांनी कोणता मार्ग अवलंबला ?

३) जोतीराव एकाकी का पडले ?

४) स्वागत समारंभाच्या खर्चाला जोतीरावांचा विरोध का होता ?

५) जोतीरावांच्या मित्राचे नाव काय होते ?

———!!!!!———

https://www.cbseboardonline.com